महाराष्ट्र शासन
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती
प्लाट नं-पी-१०७, महिला रुग्णालयासमोर, एम.आय.डी.सी. परीसर, बारामती जि. पुणे
ईमेल:-deangmcbaramati@gmail.com वेब साईट :- www.gmcbaramati.org

जा.क्र.पुअहोशावैमबा/अका/५४५/२०२४ दिनांक १०/१०/२०२४ 14.10.2024

कार्यालयीन आदेश

विषय :- वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत उद्योजकांचे सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम/ कार्यांचे सुलभीकरण व समन्वय याकरिता संचालनालय स्तरावर सी.एस.आर. कक्ष स्थापन करणेबाबत

संदर्भ :- १) संचालनालयाचे पत्र क्रमांक १२०३३/१/२०२४- EDU, दिनाक /१०/२०२४
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र/सीएसआर०९२४/प्र.क्र.३७० /प्रशा-२ दिनांक१२/०९/२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, संस्थेतील सी.एस.आर. च्या कार्याचे सुलभीकरण करणे व कामांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी वरील शासन निर्णयात नमुद केल्यानुसार संस्थास्तरावर खालीलप्रमाणे सी.एस.आर कक्षाची स्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | समितीचे पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. चंद्रकांत म्हस्के, अधिष्ठाता, पु.अ.हो.शा. वै.म. बारामती | अध्यक्ष |
| २ | डॉ.अमोल शिंदे, वैद्यकीय अधिक्षक, शा.वै.म.व स.रु. बारामती | सदस्य |
| ३ | संबंधित विभागाचे विभागप्रमुख | सदस्य |
| ४ | श्री.नंदकुमार कोकरे, प्रशासकीय अधिकारी, पु.अ.हो. शा.वै.म.बारामती | सदस्य |
| ५ | प्रशासकीय अधिकारी, शा.वै.म.व स.रु. बारामती | सदस्य |
| ६ | श्री.बालाजी चांडोळकर, समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय ) | सदस्य सचिव |
| ७ | श्री. समर्थ सुरवसे, समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) | सदस्य |

संस्थास्तरावर सी.एस.आर. कक्षाचे कार्य :

१) संस्थास्तरावरील सी.एस.आर. कक्ष हा संस्थास्तरावरील सी.एस.आर. बाबत सर्व कार्यावर देखरेख ठेवेल व त्यासाठी आवश्यक समन्वय घडवून आणेल सदर कक्ष जिल्हयातील व जिल्हयाबाहेरी ज्या उद्योजकांना सी.एस.आर. उपक्रमामध्ये समाविष्ट करुन घेण्यासाठी नियमितपणे संपर्क करील.

२) जिल्हयाच्या व संस्थेच्या पोर्टलवर संस्थेतील गरजा प्रकाशित करण्याची जबाबदारी असेल आणि याची प्रक्रिया संचालनालय पातळीवर समितीच्या मंजुरीनुसार असेल.

३) सी.एस.आर. उपक्रम करण्यास उत्सुक अशा सर्व उद्योजकांबददलची माहिती संकलीत करण्याची जबाबदारी ही संस्थास्तरावरील समितीची असेल आणि त्याचा अहवाल संचालनालय स्तरीय कक्षास नियमित अहवाल पाठविणे.

४) सी.एस.आर. उपक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे आणि संचालनालय स्तरीय कक्षास नियमित अहवाल पाठविणे.

उपरोक्त समितीने संदर्भिय शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे व वर दिलेल्या कार्यप्रणालीनुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. (सोबत शासन निर्णयाची प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.)

(डॉ. चंद्रकांत भा. म्हस्के)
अधिष्ठाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बारामती

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रति,
वरील सर्व सबंधित अधिकारी व कर्मचारी

प्रत :- मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.